अभियांत्रिकी महाविद्यालय
शिवाजीनगर पुणे ५
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था, पुणे ५)
दूरध्वनी क्र.२५५०७३१० फॅक्स नं. ०२०२५५०७२९९


दिनांक- १८/०९/२०१७

# शिष्यवृत्तीच्यासंदर्भात विद्यार्थ्यांसाठी सूचना

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये या संस्थेत प्रथम /व्दितीय/तृतीय/अंतिम वर्ष पदवी व प्रथम / व्दितीय वर्ष पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या ज्या विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांना सवलत (पी.टी.सी. ) किंवा माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यांना सवलत (एस.टी.सी.) सवलत घ्यावयाची आहे व जे विद्यार्थी अपंग आहेत त्यांना **अपंग शिष्यवृत्ती** घ्यावयाची आहे त्यांनी विहित नमुन्यातील अर्ज **दि.२५/९/२०१७** पर्यंत लेखा विभागात थेट शिष्यवृत्तीचे / सवलतीचे अर्ज सादर करावेत.

***उशीरा आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत व याची सर्वस्वी जबाबदारी संबधित विद्यार्थ्यांची असेल याची नोंद घेण्यात यावी.***

वरील सवलतींसाठी उत्पन्नाची मर्यादा व अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे याबाबतची माहिती खालील तक्त्यात दिलेली आहे. त्यानुसार परिपूर्ण अर्ज करावेत. अपूर्ण अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

COLLEGE OF ENGINEERING • PUNE •

# तक्ता

| अ. क | सवलतीचा प्रकार | उत्पन्न मर्यादा | अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे | शिष्यवृत्ती रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या पाल्यांना सवलत (पी.टी.सी./एस.टी.सी.) | मर्यादा नाही | मागील वर्षाची गुणपत्रिका , पालकांचे नोकरीचे प्रमाणपत्र ,प्राथमिक शिक्षकांच्या बाबतीत गटशिक्षणाधिकारी यांची सही व शिक्का , माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत शिक्षणाधिकारी यांची सही व शिक्का , आधार कार्डची छायांकित प्रत, स्टेट बॅंक ऑफ इंडिया मध्ये खाते असलेल्या पास बुकची छायांकित प्रत | ४०००/- |
| २ | अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती | मर्यादा नाही | सिव्हील सर्जनचा Computerised अपंगत्वाचा दाखला, मागील वर्षाचे मार्कलिस्ट, फि भरल्याची रिसीट, स्टेट बॅंक ऑफ इंडिया मध्ये खाते असलेल्या पास बुकची छायांकित प्रत , आधार कार्डची छायांकित प्रत. | जिल्हा परिषद यांच्या नियमाप्रमाणे विद्यार्थ्याने दाखल केलेल्या खर्चावर आधारीत |

तसेच फॉर्म भरताना खालील सूचनांचे पालन करण्यांत यावे.

(१) एस.टी.सी./पी.टी.सी. सवलतीच्या बाबतीत केवळ अनुदानित शाळेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पाल्यांनाच या सवलतीचा लाभ मिळेल. विनाअनुदानीत शाळेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पाल्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही.

(२) उत्पन्न प्रमाणपत्राच्या बाबतीत वडिल हयात नसल्यास त्यांच्या मृत्यूचा दाखला जोडावा . आई व वडिल दोघेही हयात नसल्यास पालकांच्या उत्पन्नाचा दाखला जोडावा.

(३) अपंग विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा अर्ज संस्थेच्या विद्यार्थी ग्राहक भांडारामधून घेउन पूर्ण भरुन महाविद्यालयाच्या लेखा विभागात संचालकांच्या सही शिक्क्यासाठी जमा करावा.सदर अर्जावर संचालकांची सही शिक्का झाल्यानंतर लेखा विभागातून अर्ज जिल्हा परिषदेमध्ये जमा केले जाईल. ज्या विद्यार्थ्यांना इतर कोणतीही शिष्यवृत्ती मिळत असेल तर सदर विद्यार्थ्यांने या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करु नये.

COLLEGE OF ENGINEERING PUNE

(४) वरील शिष्यवृत्तींच्या बाबतीत विद्यार्थ्याचे कोणत्याही स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये खाते उघडणे गरजेचे आहे. जेणेकरुन वरील संबधित कार्यालयाकडून शिष्यवृत्तीची रक्कम प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्याच्या खात्यावर जमा करणे सोईस्कर होईल.

(५) शासनाच्या नियमानुसार प्रत्येक विद्यार्थ्याने एका वेळी एकाच शिष्यवृत्ती/सवलतीचा लाभ घ्यावा.

(६) वरील शिष्यवृत्तीचे अर्ज लेखाविभागात सादर केल्यानंतर संबधित विद्यार्थ्यांनी अर्जाची पोच पावती (**Acknowledgement Receipt**)लेखा विभागातून घ्यावी. तसेच पोच पावती शिष्यवृत्तीची रक्कम मिळेपर्यंत संभाळून ठेवावी. पोच पावतीशिवाय कोणतीही तकार ऐकूण घेतली जाणार नाही. पोच पावती हरविल्यास आपण शिष्यवृत्तीचा अर्ज भरला नाही असे समजण्यात येईल.

संचालक
अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे ५

COLLEGE OF ENGINEERING PUNE